


RNI NO. MAHMAR/2020/84035

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ




गुरूवार, २९ मे २०२५ | वर्ष : ५ | अंक : १५१ | दैनिक | किंमत : ₹ ५/-

Thursday, 29 May 2025 | Year : 5 | Issue : 151 | Daily | Rate: Rs. 5/-

# काश्मीरमधली पर्यटनस्थळे लवकरच खुली होणार



‘प्रधानमंत्रींनी पर्यटन पुनरुज्जीवित करण्यासाठी काही पावले उचलली आहेत. काही दिवसांपूर्वी त्यांनी एक बैठक घेतली होती. त्यामध्ये सर्व वरिष्ठ अधिकारी आणि पर्यटनमंत्री उपस्थित होते. दोन दिवसांपूर्वी नीती आयोगाच्या बैठकीत मला प्रधानमंत्रींशी बोलण्याची संधी मिळाली. जम्मू-काश्मीरमध्ये पर्यटन कसे पुनरुज्जीवित करता येईल यावर आम्ही चर्चा केली. मी ते आता जाहीर करू शकत नाही. मात्र, काही ठोस पावले उचलली जातील.

– मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला



**श्रीनगर :** मंगळवारी जम्मू-काश्मीर मंत्रिमंडळाची पहलगाम येथे बैठक झाली. गेल्या महिन्यात झालेल्या दहशतवादी हल्ल्यात 26 नागरिकांची हत्या झाली होती. पहलगाम या पर्यटनस्थळाबाबत मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी एक संदेश अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला. पर्यटन हे संघर्षमुक्त असावे आणि सरकार या प्रदेशातील संघर्षरहित घडामोडींपासून ते वेगळे करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करील.

जम्मू-काश्मीरमधील दुहेरी सत्ताकेंद्रे, त्यांचे सरकार आणि उपराज्यपाल यांच्या आव्हानांचा उल्लेख करतांना ओमर म्हणाले, ‘तीन सरकारांनी (या दोन संस्था आणि केंद्र) यांनी एकत्र काम करण्याची आवश्यकता आहे. पर्यटन ही माझी जबाबदारी आहे; मात्र पर्यटकांची सुरक्षा ही माझी जबाबदारी नाही. ते पुढे म्हणाले, ‘जम्मू व काश्मीरचे निवडून आलेले सरकार, जम्मू व काश्मीरचे निवडून न आलेले सरकार आणि केंद्र अशा तीन सरकारांना येथे एकत्र काम करावं लागेल.’ जम्मू आणि काश्मीरमध्ये पर्यटन पुनरुज्जीवित करण्यासाठी काही ठोस पावले उचलण्यासाठी राज्य केंद्राशी चर्चा करीत आहे.

‘आमच्यासाठी पर्यटन हा एक आर्थिक स्त्रोत आणि उपजीविकेचे साधन आहे. दुर्दैवाने येथील परिस्थितीचा पर्यटनावर परिणाम होतो. मात्र, या अडचणी सोडविण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. जगाने पर्यटनाकडे इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा आर्थिक स्त्रोत म्हणून पाहावे, अशी आमची इच्छा आहे, असे ओमर अब्दुल्ला म्हणाले.

‘गेले काही आठवडे देशासाठी सोपे नव्हते हे मला माहीत आहे. मात्र, जम्मू-काश्मीरवर सर्वाधिक परिणाम झाला आहे, या शब्दांत ओमर यांनी चिंता व्यक्त केली. पर्यटनाच्या पुनरुज्जीवनासाठी पावले उचलण्याचा आमच्या सरकारचा प्रयत्न आहे. मला खात्री आहे की, केंद्राला आमच्याकडून जे काही सहकार्य हवे असेल, ते आम्ही देऊ, असेही ओमर पुढे म्हणाले.

मंत्रिमंडळाचा पहलगाम दौरा हा प्रशासकीय नाही, तर तो लोकांना सुरक्षिततेची भावना देण्यासाठी असल्याचे ओमर अब्दुल्ला यांनी स्पष्ट केले. *‘पहलगाम येथे मंत्रिमंडळाची बैठक झाली. ही केवळ एक नियमित प्रशासकीय बैठक नव्हती, तर तो एक स्पष्ट संदेश होता. जम्मू आणि काश्मीर खंबीर, मजबूत व निर्भय आहे’, असेही त्यांनी एक्सवर पोस्ट केले आहे.* पहलगाम हल्ल्यानंतर पर्यटकांसाठी बंद केलेली पर्यटनस्थळे उघडण्याची मागणीही ओमर अब्दुल्ला यांनी केली. *‘बैसरन हल्ल्यानंतर पर्यटनस्थळांचे सुरक्षा ऑडिट करण्याचा निर्णय घेण्यात आला. सुरक्षा ऑडिटनंतर ती हळूहळू खुली केली जातील आणि ती खुली झाली पाहिजेत’, असे ओमर यांनी सांगितले. ‘मी येथील लोकांना भेटलो आणि पर्यटकांनीही मला सांगितले की, ते स्वतःहून आले आहेत’, असे सांगून ते पुढे म्हणाले की, बैसरन बंद ठेवता येईल; पण बेताब खोरे आणि अरू खोरे सुरू झाले पाहिजे.*

हल्ल्यानंतर 48 ठिकाणे पर्यटकांसाठी बंद करण्यात आली होती. त्यामध्ये श्रीनगरमधील बदामवारी व ट्यूलिप गार्डन यांचा समावेश होता. ‘जर ट्यूलिप गार्डन बंद करणे आवश्यक असेल, तर आपल्याला संपूर्ण काश्मीर बंद करावे लागेल’, असे ओमर म्हणाले. ‘सोनमर्गमधील बेताब खोरे, अरू खोरे, थाजीवास हिमनदी ही पर्यटनस्थळे पर्यटकांसाठी खुली करण्यासाठी चर्चा सुरू आहे. आपल्याला थोडे धाडस दाखवावे लागेल आणि हळूहळू ही ठिकाणे खुली करावी लागतील’, असे ओमर यांनी स्पष्ट केले. ‘अमरनाथ यात्रा सुरक्षितपणे पार पडली, तर पर्यटक काश्मीरमध्ये परत येण्यास मदत होईल, अशी आशा लोकांनी व्यक्त केली’, असेही ते म्हणाले.

# भारताने पाठवलेले हजारो किलो आंबे अमेरिकेने नाकारले?

**नवी दिल्ली :** भारताने निर्यात केलेला आंबा अमेरिकेत पोहोचल्यावर त्याठिकाणच्या अधिकाऱ्यांनी त्याची डिलिव्हरी घेण्यास नकार दिला आहे. त्यामुळे भारतीय आंबा निर्यातदारांना मोठ्या नुकसानीचा सामना करावा लागणार आहे. अमेरिकेच्या अधिकाऱ्यांना हे आंबे परत घेण्याची किंवा नष्ट करण्याची सूचना दिली होती, असे संबंधित निर्यातदारांनी सांगितले आहे.




मात्र, आंबे नाशवंत उत्पादनांमध्ये मोडत असल्याने तसेच परत आणण्यासाठी प्रचंड खर्च लागणार असल्याने, भारतीय निर्यातदारांनी ते तिथेच नष्ट करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे निर्यातदारांचे सुमारे पाच लाख डॉलर्स म्हणजेच सुमारे 4.2 कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचे एका निर्यातदाराने सांगितले आहे.

तर, फ्रेश व्हेजिटेबल्स अँड फ्रुट एक्सपोर्टर्स असोसिएशन ऑफ इंडियाने (वाफा) दिलेल्या माहितीनुसार, या घटनेनंतरही आंब्याची निर्यात सुरू आहे. तसेच गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा जास्त निर्यात होण्याची अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे.

मुंबईहून आठ आणि नऊ मे रोजी आंब्याची एक मोठी खेप अमेरिकेला निर्यात करण्यात आली होती. पण तयाठिकाणी पोहोचल्यावर अमेरिकेच्या अन्न आणि सुरक्षितता (फूड अँड सेफ्टी) अधिकाऱ्यांनी हा आंबा स्वीकारण्यास नकार दिला होता. निर्यातदारांनी सांगितले की, सुमारे 15 ते 17 टन आंब्यांची डिलिव्हरी नाकारण्यात आली आहे. त्यांच्या मते, हे आंबे नष्ट करण्यात आले. कारण ते परत भारतात आणण्यासाठी खूप जास्त खर्च झाला असता. अमेरिकेतील लॉस एंजेलिस, सॅन फ्रान्सिस्को आणि अटलांटा विमानतळांवर हे आंबे उतरवण्यात आले होते.

# नागपुरातील तरुणांच्या व्हिजनमुळे पोलिसांना ‘गरुडदृष्टी’



**नागपूर :** मागील काही कालावधीपासून संपूर्ण देशात सायबर गुन्ह्यांचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. विशेषतः सोशल मीडियाच्या माध्यमातून सामाजिक तेढ निर्माण करून कायदा व सुव्यवस्थेवर आघात करणारे ‘डिजिटल असुर’ चिंतेचा विषय बनले आहे. अशाच तत्त्वावर बारीक लक्ष ठेवण्यासाठी आणि त्यांच्या पोस्ट व्हायरल होण्याअगोदरच त्या हटविण्यासाठी नागपूरपोलिसांच्या हाती गरुडदृष्टीचे अस्त्र आले आहे. नागपुरातील तरुणांच्या व्हिजनमुळे ही प्रणाली विकसित झाली असून याच्यामुळे सोशल माध्यमांतील घडामोडींवर विशेष लक्ष ठेवता येणार आहे. विशेष म्हणजे, नागपूर पोलिसांनी आयोजित केलेल्या ‘सायबर हॅकेथॉन’ मधूनच नागपूरकर तरुणांची ही ‘आयडिया’ प्रत्यक्षात उतरली आहे. श्रेयस कावळे, अखिलेश तळसमुद्रकर, साईश चवरे या तीन तरुणांच्या प्रयत्नाने सायबर पोलिसांना मोठे बळ मिळाले आहे. तीनही तरुण आयटी विषयातील तज्ज्ञ आहेत. 30 वर्षीय श्रेयस हा स्वतः आयटी कंपनी चालवतो व तो सॉफ्टवेअर डेव्हलपर आहे, तर अखिलेश व साईश हे दोघेही सायबर सुरक्षेच्या ‘डोमेन’मध्ये काम करतात. पोलिसांनी काही महिन्यांअगोदर ‘सायबर हॅकेथॉन’चे आयोजन केले होते.

# आमच्या इथे नालेसफाई झालीच नाही...



**मुंबई :** मुंबईत 26 मे रोजी झालेल्या पावसामुळे सर्वत्र पाणी साचल्याचे पाहायला मिळाले. मुंबईच्या अनेक सखल भागांमध्ये तसेच रेल्वे,मेट्रो, हॉस्पिटल आणि घरांमध्ये पाणी साचून जनजीवन विस्कळीत झाले होते. मुंबईत पाणी साचण्यामागे अनेक कारणे आहेत. यामध्ये महत्त्वाचे म्हणजे मुंबईत दरवर्षीप्रमाणे होणारी नालेसफाई न होणे तसेच मिठी नदीची स्वच्छता न होणे ही प्रमुख कारणं आहेत. यंदादेखील मुंबईत पावसाळ्यापूर्वी नालेसफाई ठिकठिकाणी सुरू असल्याचे मुंबई महापालिका प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले. महापालिकेने निर्माण केलेल्या संकेतस्थळावर नालेसफाईची आकडेवारी दाखवत महापालिकेकडून नालेसफाईचा दावा करण्यात आला होता.

# इराणमध्ये तीन भारतीय तरुण बेपत्ता



**नवी दिल्ली :** पंजाबमधील संगरूर, होशियारपूर आणि एसबीएस नगर येथून इराणला गेलेले तीन भारतीय बेपत्ता आहेत, अशी माहिती तेहरानमधील भारतीय दूतावासाने दिली आहे आणि त्यांना ‘तातडीने’ शोधण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले आहे. बेपत्ता झालेल्या तिघांची ओळख पटली आहे. हुशनप्रीत सिंग (संगरूर), जसपाल सिंग (एसबीएस नगर) आणि अमृतपाल सिंग (होशियारपूर) अशी त्यांची नावे असून ते सर्व 1 मे रोजी तेहरानमध्ये उतरल्यानंतर लगेचच बेपत्ता झाले. या तरुणांचं अपहरण करण्यात आल्याचाा दावा या तरुणांच्या कुटुंबियांकडून करण्यात आला आहे.

# अमेरिकेत शिकायला जाणे आता अवघड?



**नवी दिल्ली :** हार्वर्ड विद्यापीठासह अमेरिकेतील अनेक शिक्षण संस्थांना ट्रम्प सरकारच्या नव्या निर्णयांचा फटका बसतो आहे. परदेशी विद्यार्थ्यांवरदेखील ट्रम्प सरकारच्या नव्या धोरणाचा मोठा परिणाम होणार आहे. त्यातच ट्रम्प सरकारने आणखी एक पाऊल उचलत अमेरिकेत शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्यांसमोरील अडचणीत आणखी भर घातली आहे. डोनाल्ड ट्रम्प सरकारने जगभरातील अमेरिकेच्या दूतावासांना विद्यार्थी व्हिसासाठी अपॉईंटमेंट देणे थांबवण्याचे आदेश दिले आहेत.

# पेन्शन हा दानधर्म नव्हे : उच्च न्यायालय



**कोलकाता :** पश्चिम बंगालमधील हूगळी-चिन्सुराह नगरपालिकेविरोधातील निवृत्तीवेतनाबाबतच्या (पेन्शन) एका याचिकेवर सुनावणी करताना कोलकाता उच्च न्यायालयाने महत्त्वाची टिप्पणी करत पालिकेला फटकारे आहे. न्यायालयाने म्हटले आहे की **‘निवृत्तीवेतन हा काही दानधर्म नाही, तो कर्मचाऱ्यांचा कायदेशीर अधिकार आहे’**. 148 निवृत्त कर्मचाऱ्यांना पेन्शन देण्यास विलंब झाल्याबद्दल एका कर्मचाऱ्यांने उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवर उत्तर देतांना पालिकेने तांत्रिक अडचणी आल्याचे कारण सांगितले होते. त्यावर न्यायालयाने म्हटले आहे की ‘त्या कर्मचाऱ्यांनी वर्षानुवर्षे काम करून तो अधिकार मिळवला आहे आणि तुम्ही तांत्रिक अडचणी सांगता’. कोलकाता उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती गौरांग कांत म्हणाले, ‘प्रदीर्घ काळ व सातत्याने सेवा दिल्यानंतर कर्मचाऱ्यांना मिळालेल्या पेन्शन आणि निवृत्तीनंतरचे इतर लाभ देतना एका दिवसाचा देखील विलंब होता कामा नये. अशा प्रकरणांमध्ये उशिरा निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागतो. कारण निवृत्तीनंतर उदरनिर्वाहासाठी हे कर्मचारी पैन्शनच्या पैशांवर अवलंबून असतात.

# सीआरपीएफ जवान निघाला पाकिस्तानचा हेर

**नवी दिल्ली :** भारत-पाकिस्तान यांच्यातील लष्करी संघर्षानंतर राष्ट्रीय तपास संस्था, गुप्तचर यंत्रणांनी देशभरातील संशयितांचा धांडोळा घेतला. यात अनेकजण पाकिस्तानचे हेर असल्याचे प्राथमिक तपासातून समोर आले आहे. एनआयएने आता आणखी एका हेराला अटक केली असून, तो 2023 पासून पाकिस्तानी गुप्तचर अधिकाऱ्याला माहिती पुरवत होता. एनआयएने एक निवेदन जारी करून या अटकेती माहिती दिली आहे. एनआयएने म्हटले आहे की, संवेदनशील माहिती पाकिस्तानी गुप्तचर अधिकाऱ्याला पुरवल्याप्रकरणी सीआरपीएफच्या एका अधिकाऱ्याला अटक करण्यात आली आहे.




एनआयएने सांगितले की, हेरगिरी प्रकरणात अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव मोती राम जाट असे आहे. तो हेरगिरी प्रकरणात सक्रिय असल्याचे आढळून आले. त्याने राष्ट्रीय सुरक्षेसंदर्भातील अतिमहत्त्वाची आणि संवेदनशील माहिती पाकिस्तानातील गुप्तचर अधिकाऱ्याला पुरवली आहे.

**दिल्लीत केली अटक**

एनआयएने मोती राम जाट याला दिल्लीत अटक केली. त्याची सध्या चौकशी केली जात आहे. आरोपीला न्यायालयासमोर हजर करण्यात आले. पटियाला हाऊस कोर्टातील विशेष न्यायालयाने त्याला 6 जूनपर्यंत एनआयए कोठडी सुनावली आहे

2023 पासून मोती राम जाट हा पाकिस्तानी गुप्तचर अधिकाऱ्याला माहिती पुरवत होता. आरोपी मोती राम जाट याला पाकिस्तानी गुप्तचर अधिकाऱ्याकडून वेगवेगळ्या मार्गाने पैसे मिळाले असल्याचेही आढळून आले आहे, अशी माहितीही एनआयएने दिली आहे.

# बाबा, मला वाचवा; घाबरलेल्या वडिलांचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू



**भोपाळ :** मध्य प्रदेशातल्या भोपाळमधली एक घटना समोर आली आहे. आठ वर्षांचा मुलगा लिफ्टमध्ये अडकल्याने वडील इतके गर्भगळीत झाले की त्यांचा हृदय विकाराचा झटका येऊन मृत्यू झाला. भोपाळ या ठिकाणी रॉयल फार्म विला नावाची सोसायटी आहे. त्या ठिकाणी ही धक्कादायक घटना घडली आहे.

# आंबेडकर असोसिएशन ऑफ नॉर्थ अमेरिका तर्फे सामाजिक परिवर्तनाच्या प्रणेत्यांचे नावे पुरस्कार प्रदान

**नवी दिल्ली :** आंबेडकर असोसिएशन ऑफ नॉर्थ अमेरिका (AANA) ने 23-26 मे 2025 दरम्यान पेनसिल्व्हेनियातील माउंट प्लेझंट येथील लॉरेलव्हिल रिट्रीट सेंटर येथे झालेल्या वार्षिक रिट्रीट दरम्यान 2025 च्या AANA पुरस्कारांच्या विजेत्यांची अभिमानाने घोषणा केली.

AANA वार्षिक रिट्रीटमध्ये उत्तर अमेरिका आणि भारतातील 200 हून अधिक सहभागींनी चार दिवस धम्म-केंद्रित शिक्षण, ध्यान, पॅनेल चर्चा, सांस्कृतिक कार्यक्रम, बाह्य क्रियाकलाप आणि प्रतीकात्मक ‘समानतेसाठी धाव’ या कार्यक्रमासाठी एकत्र आले.




**पुरस्कार विजेते – 2025**

सावित्रीमाई फुले आंतरराष्ट्रीय पुरस्कार (शाहीर शीतल साठे ), महाराष्ट्रातील पुणे येथील प्रसिद्ध लोककलाकार, कवयित्री आणि बहुजन हक्क कार्यकर्त्या, शाहिरा शितल साठे यांना पारंपारिक संगीत प्रकारांना धाडसी, सामाजिक जाणीव असलेल्या संदेशांसह एकत्रित करण्याच्या त्यांच्या अग्रगण्य प्रयत्नांसाठी सन्मानित करण्यात आले. सुजाता वहाणे यांनी त्यांच्या वतीने पुरस्कार स्वीकारला.

**मूकनायक पत्रकारिता उत्कृष्टता पुरस्कार (आवाज इंडिया टीव्ही)**

या वर्षीचा मूकनायक एक्सलन्स इन जर्नलिझम पुरस्कार आवाज इंडिया. टीव्हीला प्रदान करण्यात आला, जो 25 लाखांहून अधिक सदस्यांसह एक आघाडीचा हिंदी भाषेतील डिजिटल आणि केबल न्यूज प्लॅटफॉर्म आहे. त्याच्या स्थापनेपासून, आवाज इंडिया टीव्हीने वकिली करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. आवाज इंडिया टीमच्या वतीने विजय बगाडे आणि विश्वनाथ मेश्राम यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

डॉ. बी.आर. आंबेडकर आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ आणि लेखक डॉ. विवेक कुमार यांना जाती अभ्यास, भारतीय डायस्पोरा शिष्यवृत्ती आणि आंबेडकरवादी सामाजिक विचारांमध्ये त्यांच्या अभूतपूर्व योगदानासाठी गौरविण्यात आले. नवी दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठ (जेएनयू) येथे प्राध्यापक असलेले डॉ. कुमार हे भारतातील जाती आणि लोकशाही (2014) या पुस्तकाचे लेखक आहेत आणि त्यांनी कोलंबिया विद्यापीठ आणि हम्बोल्ट विद्यापीठात अभ्यागत प्राध्यापक म्हणून प्रतिष्ठित शैक्षणिक पदांवर काम केले आहे. डॉ. कुमार यांनी कॅनडामधील अनेक संस्थांमध्ये प्रतिष्ठित आंबेडकर स्मृती व्याख्याने देखील दिली आहेत, डॉ. आंबेडकरांच्या प्रेरणेने सामाजिक सुधारणा, समानता आणि बौद्धिक चौकशीला प्रोत्साहन देत आहेत. डॉ. कुमार या कार्यक्रमाला उपस्थित राहू शकले आणि त्यांनी हा पुरस्कार त्यांच्या आईला समर्पित केला.

हे सन्मान डॉ. बी.आर. आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीमाई फुले आणि सामाजिक परिवर्तनाच्या इतर प्रणेत्यांचे दृष्टिकोन आणि वारसा टिकवून ठेवण्यासाठी काम करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांच्या अथक प्रयत्नांना मान्यता देण्याच्या आणि त्यांना पाठिंबा देण्याच्या AANA च्या वचनबद्धतेला पुन्हा पुष्टी देतात.

# वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणी सासरा आणि दीर यांना तीन दिवसांची पोलीस कोठडी




**मुंबई :** वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणात सासरा राजेंद्र हगवणे, दीर सुशील हगवणे यांना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. तर नवरा शशांक, नणंद करीश्मा आणि सासू लता यांना एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.16 मे रोजी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते राजेंद्र हगवणे यांची सून वैष्णवीने आत्महत्या केली. यामागे हुंड्यासाठीचा छळ, कौटुंबिक हिंसाचाराचे आरोप आहेत. या प्रकरणात वैष्णवीचे सासरे आणि दीर हे दोघंही फरार झाले होते ज्यांना आठ दिवसांनी अटक करण्यात आली. आता या प्रकरणात वैष्णवीचा सासरा, दीर, नवरा, सासू आणि नणंद यांना पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

पुण्यातील मुळशी तालुक्यातील भुकूम येथे 16 मे 2025 रोजी वैष्णवी शशांक हगवणे या 23 वर्षीय विवाहितेने गळफास घेऊन आत्महत्या केली. वैष्णवी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते राजेंद्र हगवणे यांची सून होती. वैष्णवीच्या मृत्यूमुळे राज्यभरात खळबळ उडाली आहे. वैष्णवीच्या माहेरच्यांनी आरोप केला आहे की, सासरच्या मंडळींनी हुंड्यासाठी तिचा मानसिक आणि शारीरिक छळ केला.



“ विचार करा, प्रारंभ करा, आणि आत्मविश्वासाने पुर्ण करा. ”



# जातीअंत की जाती पुरुज्जीवन ? (भाग -3)

*(चेन्नई, तामीळनाडू येथे 1 मे 22 रोजी संपन्न झालेल्या सामाजिक न्याय परिषदेत निमंत्रित वक्ते प्रा. श्रावण देवरे यांचे भाषण झाले. या इंग्रजी भाषणाचा मराठी अनुवाद लेख स्वरूपात देत आहोत. कार्यक्रमात वेळेचे बंधन असल्याने भाषण संक्षिप्तच करावे लागते. मात्र अनेक हितचिंतकांनी विनंती केली की, हे भाषण लेखस्वरूपात सविस्तर लिहावे. त्यांच्या विनंतीवरून हे भाषण विस्तारीत केले असून आपल्या वाचकांसाठी सादर करीत आहे. - संपादक)*

कांशीराम यांच्या पक्षात अनेक ओबीसी आमदार व काही ओबीसी खासदार होते. आपल्याच पक्षाच्या ओबीसी नेत्यांच्या नेतृत्वाखाली अब्राम्हणी प्रतिकांच्या मिरवणूका उत्तर भारतातून काढता आल्या असत्या. त्यामुळे रामाच्या नावाने बहुजनांचे एकतर्फी होत असलेले ब्राम्हणीकरण काही अंशी थोपवता आले असते. परंतू कांशीरामसाहेब ना फुलेवादी होते ना आंबेडकरवादी! केवळ दोन-तीन जातींचे गठजोड तयार करून राजकिय सत्ता मिळविणे, एवढाच त्यांचा उद्देश होता. त्यासाठी त्यांनी कधी काँग्रेस, कधी भाजपा तर कधी सरळ ब्राम्हण जातीशी एकतर्फी दोस्ती केली. त्याचे परिणाम पुढे काय झालेत ते आज आपण बसपाच्या अधःपतनातून पाहात आहोतच. मद्रास प्रांतातील ओबीसी नेते सामी पेरियार हे फुलेवादी होते. त्यांनी तात्यासाहेब महात्मा फुलेंच्या ''ब्राम्हणी-अब्राम्हणी'' वादाला निरिश्वरवादाची झालर लावून विकसित केले व अब्राम्हणी क्रांती यशस्वी केली. त्यांनी ''The Ramayana: A true reading'' (सच्ची रामायण) हा महाग्रंथ लिहून ब्राम्हण संस्कृतीच्या विरोधात मोठी चळवळ उभी केली. ब्राम्हणी रामाला खलनायक सिद्ध करून रावणाला बहुजनांचा नायक व आदर्श राजा असल्याचे सिद्ध केले. या सांस्कृतिक प्रबोधनामुळे जनतेचा प्रचंड पाठिंबा मिळाला, ज्यामुळे त्यांचा द्रमुक पक्ष प्रचंड बहुमताने कायमचा सत्तेवर आला आहे.

कांशिराम यांच्या काळात उत्तर भारतात दुसरा सामी पेरियार जन्माला आला. उत्तर भारतातील ओबीसी नेते व विचारवंत ललईसिंह यादव यांनी पेरियारजींचे इंग्रजी पुस्तक हिंदीत 'सच्ची रामायण' या नावाने 1968 साली प्रकाशित केले व ब्राम्हणी रामाविरोधात सांस्कृतिक संघर्ष सुरू केला. उत्तर प्रदेश सरकारने 1969 मध्ये या पुस्तकाच्या सर्व प्रती जप्त केल्या आणि पुस्तकावर बंदी घातली. हा सांस्कृतिक संघर्ष उत्तर भारतात दीर्घकाळ चालू होता. हा सांस्कृतिक संघर्ष अलाहाबाद उच्च न्यायालय आणि नंतर सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहोचला. 16 सप्टेंबर 1976 रोजी पुस्तकाच्या बाजूने निकाल देण्यात आला. सर्वोच्च न्यायालयाने पुस्तकावरील बंदी उठवण्याचे आणि जप्त केलेली सर्व पुस्तके परत करण्याचे आदेश दिलेत. देशपातळीवर सुरू असलेल्या या ब्राम्हणी-अब्राम्हणी संघर्षाच्या काळातच (1968-1978) कांशीराम साहेब, खापर्डे साहेब व दिना भाना साहेब यांनी बामसेफ नावाची संघटना स्थापन करून देशभर अभ्यास शिबिरे (Cader Camp) घेण्यास सुरुवात केली.

दक्षिणेतील पेरियार व उत्तरेतील ललईसिंह यादव या दोन ओबीसी नेत्यांचा आदर्श घेऊन त्यांनी केलेला अब्राम्हणी संघर्ष कांशीराम-खापर्डे यांनी केडर कॅम्पमध्ये शिकविला असता तर आज कांशीरामजींची बहुजन समाज पार्टी सत्तेत दिसली असती. बहुजन समाज पक्षाची स्थापना 1984 मध्ये केल्यानंतरही कांशीरामजी स्वतः देशभर केडर कॅम्प घेत असत. मी त्यांच्या कॅडर कॅम्पला हजेरी लावली आहे. या केडर कॅम्पमधून बहुजन समाज पक्षाचा विस्तार देशभर सुरू होता. संघ-भाजपने 1984 पासूनच राम मंदिरासाठी ब्राम्हणी कुप्रबोधनाची मोहिम देशभर सुरू केलेली होती.




त्याचवेळी कांशीराम साहेबांचे कॅडर कॅम्पही जोरात सुरू होते. पण कांशीरामजींच्या शिबिरात केवळ 15-85, आरक्षण, वर्ण-जाती रचना, ब्राम्हणवाद विरोध याच मुद्यांवर चर्चा होत होती. संघ-भाजपच्या राम मंदिराच्या सांस्कृतिक मुद्द्याबाबत कांशीरामजींच्या केडर कॅम्पमध्ये एका शब्दानेही चर्चा होत नव्हती. रामाविरुद्ध सीता व शंबुक यांनी दिलेला सांस्कृतिक संघर्ष व परशुराम-कृष्ण-द्रौणाचार्या या ब्राम्ही प्रतिकांविरोधात एकलव्य-कर्णाने दिलेला संघर्ष, तसेच आर्य-ब्राम्हण वामनाविरोधात बळीराजाने केलेले महायुद्ध इत्यादी प्रकारचे ब्राम्हणी-अब्राम्हणी संघर्षाचे योग्य ते शिक्षण या केडर कॅम्पसमध्ये देणे आवश्यक होते, जे कधीच दिले गेले नाही. तात्यासाहेब महात्मा फुले यांनी 'गुलामगिरी' व 'शेतकऱ्याचा असूड' या ग्रंथांमधून अशा प्रकारच्या सांस्कृतिक संघर्षाची मांडणी केलेली आहे. तात्यासाहेबांच्या याच ब्राम्हणी-अब्राम्हणी सिद्धांताचा विकास करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'रिडल्स इन हिन्दूइझम' हा महान ग्रंथ लिहीला व सांस्कृतिक संघर्ष अधिक तीव्र करून टोकदार केला. पेरियारसाहेबांनी तर ''सच्ची रामायण'' लिहून ब्राम्हणांना भर चौकात ओढून आणले व मैदानी लढाईचे आव्हान दिले. ही सांस्कृतिक लढाई यशस्वी करून पेरियार यांनी तामीळनाडू राज्यात ओबीसी-बहुजनांचा पक्ष कायमचा सत्तेत बसविला. कांशीरामजी खरे फुले-आंबेडकरवादी असते तर त्यांनी आपल्या केडर कॅम्पसमध्ये आपल्या महापुरूषांनी लिहिलेले हे चारही ग्रंथ शिकविले असते. असे प्रशिक्षण मिळाल्यावर बसपाच्या नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्तपणे अडवाणीच्या रामरथ यात्रेविरोधात सीता, शंबुक, एकलव्य, बळीराजा, रावण आदि अब्राम्हणी प्रतिकांच्या मिरवणूका देशभर काढल्या असत्या व रामाच्या नावाने चाललेले एकतर्फी ब्राम्हणी आक्रमण रोखले गेले असते. तामीळनाडूच्या पक्षाप्रमाणे बसपा देशावर राज्य करताना दिसला असता. सांस्कृतिक संघर्षाशिवाय केलेले कोणतेही राजकारण तुम्हाला 'कुणाचे तरी शेपूट वा गुलाम' बनवत असते. कांशिराम यांचा बहुजन समाज पक्ष, रामविलास पास्वान यांचा 'लोकजनशक्ती पक्ष' बाळासाहेब प्रकाश आंबेडकरांचा 'वंचित पक्ष' व रामदास आठवलेंचा 'रिपब्लिकन' हे चारही पक्ष आज भाजपाचे ''दलित सेल किंवा B-Team'' बनले आहेत. महादेव जानकर यांचा तथाकथित ओबीसी पक्ष (रासपा) हा नेहमीच भाजपाचे शेपूट म्हणून मिरवित असतो. एकेकाळी ''ओबीसींचा ढाण्या वाघ'' म्हणून प्रसिद्ध असलेले छगन भुजबळ यांची अवस्था आज फडणवीस-अजित पवारांच्या गोठ्यातील खुट्यावर बांधलेल्या शेळीसारखी झालेली आहे आणि हे सर्व घडते आहे ते केवळ फुले+पेरियार+आंबेडकरप्रणित अब्राम्हणी सांस्कृतिक संघर्ष टाळल्यामुळेच! ■■

आजचा कळीचा प्रश्न



प्रा. श्रावण देवरे
मो. 7588072832

## दृष्ट

अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

तिच्या वडिलांना लकवा झाला. कमावणाऱ्या एकमेव व्यक्तीचा रोजगार गेला. तिचे मामा त्यांच्या मदतीला धावून आले. त्या कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी त्यांनी आनंदाने स्वीकारली. त्यांनी तिच्या लग्नासाठी एक उत्तम स्थळ आणले. पण तिचे एका तरूणावर जिवापाड प्रेम होते. तिने त्याला सर्व वृत्तांत कथन केला. ती म्हणाली, 'वडिलांची जबाबादारी मोठ्या मायेने माझ्या मामांनी स्वीकारली. पण कधी कधी परिस्थितीपुढे हार मानावी लागते. इतरांच्या आनंदासाठी आपण ज्याचेवर जिवापाड प्रेम करतो त्याच्याशी असलेले नाते नाईलाजाने तोडावे लागते. खूप वेदनादायी असतात ते क्षण जेव्हा आपण पूर्णपणे कोलमडून पडलेले असल्यावरही कुटुंबाच्या आनंदासाठी आपला चेहरा हसरा ठेवणे ही आपली अपरिहार्यता असते. अश्रू ढाळणे एकवेळ सोपे असते, पण अशावेळी हसणे फार कठीण होऊन जाते. इच्छा नसतानाही जीवलग व्यक्तीची साथ यासाठी सोडावी लागते की प्रेमापेक्षाही परिस्थितीमुळे ओढवलेल्या समस्या या अधिक गंभीर असतात. हे दुःख ना डोळ्यांतून पाझरते, ना कागदावर उमटते. ते फक्त काळजाला पोखरत राहाते. खुशी तर कधीचीच नाराज होऊन निघून गेली. मनात विचार येतो की दुःखाला दृष्ट लागली असती तर किती बरे झाले असते? आयुष्याने आपल्या दोघांनाही या वळणावर आणून सोडले की पूर्वी जे प्रेम होते ते आता स्वप्न बनलेय. कधीही पूर्ण न होऊ शकणारे.' ■■

# जाईबाई चौधरी ज्ञानपीठ भारतातील एकमेव शाळा

**बोधिसत्व डॉ. बाबासाहेबांचा मानवता व देशासाठी 'मास्टर प्लान' १०८ बालकलाकारांची अभिनव सृजनात्मक, कलात्मक प्रस्तुति**

मंगळवारी बाजार न्यू कॉलनी, सदर नागपूर येथील जाईबाई चौधरी ज्ञानपीठ, माध्यामिक प्राथमिक शाळा व कला वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयच्या 108 बालकलावंतांनी नागपूर येथील दीक्षाभूमी सांस्कृतिक हॉलमध्ये 4 मे 2025 ला डॉ.बी.आर. आंबेडकरांच्या, डॉ. बाबासाहेब आंबेडकर राइटींग ॲण्ड स्पीचेस मध्ये प्रकाशित 1916 ते 1956, 24 पुस्तकावर आधारित, संगीत, गीत, नृत्य-नृत्यनाट्य आणि प्रभावी सक्षेप कथनाने साकार 2 तास 30 मिनिटाचा अखंड सांस्कृतिक कार्यक्रम 'दी मारस्टर प्लान ऑफ डॉ. बी. आर. आंबेडकर फॉर ह्युमॅनिटी ॲण्ड नेशन' हा अभिनव सृजनात्मक, कलात्मक, ऐतिहासिक, सांस्कृतिक कार्यक्रम '100 इअर्स प्री सेलिब्रेशन ऑफ जाईबाई चौधरी ज्ञानपीठ,' सादर करून प्रमुख अतिथी, उद्घाटक व गुणीजन प्रेक्षकांना केवळ मंत्रमुग्ध नव्हे तर आश्चर्यचकित केले.

कार्यक्रमाची संकल्पना दिग्दर्शन, निर्मिती जे.सी.डी. संस्थेच्या संशोधन विभागचे डायरेक्टर आयु आचार्य सुधाकर चौधरींनी केले. सहाय्यक दिग्दर्शन समाधानी रामटेके, विद्या पाझारे, अश्विनी गणवीर, सुचित्रा माटे या माजी विद्यार्थीनींने केले. संपूर्ण कार्यक्रमाचे ऑडिओ रेकॉर्डिंग चारू जिचकार, चित्रण सिनेफोटोग्राफर अभय बेडीक तर प्रकाश योजना बत्राशे व ध्वनि पाटीलने केले. मंच सजावट पारितोषिक व्यवस्थापन सुरेश सुखदेवे, चव्हान अंजली बैतुले, अश्लेषा गमे या विद्यार्थिनींनी केले.

कार्यक्रमाचा आरंभ, निळ्या प्रकाशात विभिन्न वेशभूषेत 108 कलावंत हातात दीप घेवून उभे असतांना, नमन नृत्याच्या मधूर संगीत लहरीत मान्यवर प्रमुख अतिथी उद्घाटक मा. इ. झेड. खोब्रागडे आएएस, मा. डॉ. धनराज डाहाट (विचारवंत लेखक), मा. विलास गजघाटे(ट्रस्टी दीक्षाभूमी स्मा. स.) जाईबाई चौधरींवर पीएचडी करणारी प्राध्यापिका, संचालिका प्रभा चौधरी व आचार्य चौधरी यांनी सम्यक सम्बुद्ध सिद्धार्थ गौतम, प्रियदर्शी सम्राट अशोक, छत्रपती शिवाजी महाराज, बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्त्री शिक्षणाला संपूर्ण आयुष्य समर्पित करणारे महात्मा ज्योतिबा व सावित्रीबाई फुले व त्यांचा आदर्श व डॉ. बाबासाहेबांची प्रेरणा घेवून 1922 साली अत्यंत हलाखिच्या आर्थिक, सामाजिक परिस्थितीत, नवीवस्ती नागपूर येथे मुलींची कन्या शाळा काढणाऱ्या जाईबाई चौधरी यांच्या प्रतिमेला दिप व पुष्प अर्पण करून उद्घाटन करण्यात आले.

प्रसंगी उद्घाटनपर दोन शब्द सांगतांना उद्घाटक मा. इ. झेड खोब्रागडे साहेब म्हणाले, 5000 लोकांपर्यंत संविधानाच्या उद्देशिकांचा अर्थ व संविधानाने दिलेले अधिकार, पोस्टरच्या माध्यामातून पोहोचविणारी व डॉ. बाबासाहेबांच्या 24 पुस्तकावर आधारित मास्टर प्लान सांस्कृतिक कार्यक्रम सादर करणारी जाईबाई चौधरी ज्ञानपीठ ही भारतातील एकमेव शाळा होय. प्रसिद्ध लेखक डॉ. धनराज डाहाट यांनी संस्था व शाळेचा गौरव करून इतक्या गंभीर विषयावर अभिनव, सृजनशिल प्रस्तुतीचे कौतुक व गौरव केला. दीक्षाभूमीचे ट्रस्टी मा. विलास गजघाटे आणि जाईबाईवर पीएचडी करणाऱ्या प्राध्यापिका संचालिका प्रभा चौधरी यांनी जाईच्या शैक्षणिक कार्याची स्तुत्य उपक्रमाची, धम्म व आंदोलनाच्या बांधिलकेचे कार्याचे अभिनंदन व्यक्त करून गौरव केला. संचालिका प्रभा चौधरींनी जाईबाईंच्या शैक्षणिक चळवळीची सामाजिक परिस्थितीवर दोन शब्दात सांगितले. क्लासिकल नृत्य शैलीत, पुष्कर देशमुख यांच्या घरंदाज तबल्याच्या तालावर, गायक अनिल खोब्रागडे यांच्या हृदयस्पर्शी आवाजात सादर नमन नृत्य नृत्यांगना खुशी उबाळकर व पारमी पाझारे यांच्या सादरीकरणाने या अभिनव कार्यक्रमाचा आरंभ झाला. संपूर्ण कार्यक्रम राष्ट्रभाषा हिंदीतून होता.

नृत्य संपताच लेखक-निर्देशक सुधाकर चौधरींनी प्रेक्षकांना प्रश्न केला की, डॉ. बाबासाहेबांचा मास्टर प्लान कोणता व आम्हा भारतीयांच्या सर्व गंभीर प्रमुख समस्यांचे एकमेव मुळ कारण कोणते? ऑडिशन्सच्या शांत निःशब्देचा भंग करून त्यांनी प्रेक्षकांना आव्हान केले की हा कार्यक्रम रंगमंचावर किंवा सोशल मिडियावर पाहण्यापूर्वी आपल्या हृदयावर हात ठेवून स्वतःला हे प्रश्न विचारा, स्वतःला उत्तर सांगा व नंतर कार्यक्रम बघा, कारण मानवता व सुसंघटित देश निर्मित हे प्रश्न अत्यंत महत्वाचे आहेत. डॉ. बाबासाहेबांच्या मास्टर प्लानमध्ये डॉ. बाबासाहेबांच्या मते जाती आणि त्यातून निर्मित उपजाती या प्रमुख कारण आहेत. 1916 ते 1956 पर्यंत प्रमुख 24 ग्रंथ लिहून डॉ. बाबासाहेबांनी आपला मास्टर प्लान देशास दिला. ज्यात इतर उद्भवलेल्या समस्यांचे समाधान आहे. 1916 चा कास्ट देन इंडिया' ग्रंथाचा सार सांगण्यास वर्ग 9वी चा आदर्श पवार याला आमंत्रित करण्यात आले व मास्टर प्लान कार्यक्रमाची सुरूवात झाली. आदर्श पवारने अत्यंत प्रभावीपणे भारतातील जाती या ग्रंथाचा सार प्रेक्षकांना सांगितला. भारतातील जाती विषयक कळ्ळसरपी 1936 मध्ये डॉ. बाबासाहेबांनी लिहिलेला ग्रंथ 'ॲन्हिलेशन ऑफ कास्ट' जाती निर्मुलन वर संक्षेपात प्रकाश टाकला. 11 वीची विद्यार्थीनी दिव्या वाकोडेने महाराष्ट्र शासनद्वारे प्रकाशित खंड.... अधिक माहिती साठी वाचण्याची विनंती केली. जाती कळल्या, जाती निर्मुलनची संकल्पना कळ्ली. परंतु 27 टक्के ओबीसी समाज मनुवाद्यांच्या वैचारिक गुलामगिरीत जाती मानतो, स्वतःला शुद्र समजतो. तो पर्यंत निर्मुलन प्रक्रिया सुरू कशी होईल? अज्ञानामुळ तो आपली खरी ओळख विसरला आहे. डॉ. बाबासाहेबांनी, शूद्र पूर्वी कोण होते? हा ग्रंथ लिहून ओबीसी समाजाला त्याची खरी ओळख दिली. काजल डोंगरे वर्ग 9 वा हिने स्वतःला शूद्र समजणारा ओबीसी समाज पूर्वी सूर्यवंशी क्षत्रिय होता व त्यांना शूद्र ठरविण्याची कारणे, प्रक्रिया डॉ. बाबासाहेबांच्या ग्रंथाच्या आधारे अती संक्षेपात सांगितली. जगातील श्रेष्ठतम मानवतावादी बौद्ध संस्कृतीच्या नागवंशी, मुळ निवासींना त्यांच्या पराजयानंतर, मनुवांनी अतिशूद्र, अस्पृश्य ठरवून त्यांना पशूहून हिन जीवन जगण्यास बाध्य केले. हजार वर्षाच्या मानसिक, सामाजिक, धार्मिक, गुलामीमुळे तेही आपली खरी ओळख विसरले व स्वतःला अस्पृश्य समजू लागले व मनुवाद्यांनी निर्माण केलेल्या जाती, उपजाती, उंच-नीच च्या वैचारिक चक्रव्यूहात अडकले. डॉ. बाबासाहेबांनी 1947 ला 'द अनटचेबल्स : हू वेअर दे ॲण्ड व्हाय दे बीकम अनटचेबल्स' हा ग्रंथ लिहून अतिशूद्रांना ते अस्पृश्य नाहीत ते बौद्ध आहेत, ही खरी ओळख देवून ते अस्पृश्य कसे ठरविण्यात आले याचे गहन संशोधनावर आधारित सत्य सांगितले. रितीका नागदेवे वर्ग 9 वा हिने डॉ. बाबासाहेबांच्या या ग्रंथाचा सार प्रेक्षकांना सांगितला व मुळ पुस्तक वाचण्याचे आव्हान केले. बहुजन समाजाला त्याची मुळ ओळख



दिल्यावर 1943 ला अस्पृष्याची मुक्तता व गांधी यावर डॉ. बाबासाहेबांनी विचार प्रकाशित केले. त्यावर गायत्री वर्ग 11 वा हिने त्यांचा सार सांगितला. तर गांधी आणि काँग्रेसने अस्पृश्यांसाठी काय केले याचा संक्षिप्त आलेख साक्षी पचारे वर्ग 11 वा हिने सादर केला. भारतात मनुवादी व्यवस्थेने ज्या प्रमाणे शूद्र, अतिशूद्र यांना शिक्षणाचा अधिकार नाकारून त्यांना वैचारिक, सामाजिक, धार्मिक गुलामीत कैद केले, त्याचप्रमाणे स्त्रीयांना शिक्षणापासून वंचित करून त्यांच्यावर अमानवी बंधन लादले व त्याला धर्माची बैठक दिली. बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्माचा इतर सर्व धर्माचा संशोधनाच्या बैठकीवर त्याचे गहण अध्ययन, चिंतन करून 'रिडल्स इन हिंदूजम' व 'दि राईज ॲण्ड फाल ऑफ हिंदू वुमन' हे ग्रंथ देशाला दिले. स्त्रीयांची उन्नती व अवनती या डॉ. बाबासाहेबांच्या संवेदनशील ग्रंथाचे समर्पक सार वर्ग 9 वी वैष्णवी गजभीये हिने सादर केले. स्त्रीयांच्या अवनतीचे प्रमुख मुद्दे सांगितले. डॉ. बाबासाहेबांनी स्त्रीयांच्या प्रगतीचा मार्ग आपल्या भाषणातून, लेखातून, ग्रंथातून सांगितला. तसेच त्यांच्या समस्या व अधिकाराबद्दलही सांगितले.

**आचार्य सुधाकर चौधरी**

'प्रगती की राह दिखाई। तुमने ओ बाबासाहेब।'

या भीम गीतात प्रसिद्ध गायिका श्रेया घोषाल हिने आपल्या मधुर, तालबद्ध, हृदयस्पर्शी आवाजात स्त्रीयांच्या वेदना व डॉ. बाबासाहेबांचे कार्य सांगितले आहे. या गीतावर अश्विनी गणवीर हिच्या सहाय्यक निर्देशनाखाली नृत्य प्रस्तुत केले... (1)ऋतुजा दिनेश खडसे, (2)विधी शालिक भांगे, (3)पलक राजेश कोटीया, (4) मृण्मयी दिलीप बोंडगुलवार, (5)भाग्यश्री राजेंद्र दैने, (6)लावण्या परमानंद सरोदे, (7)कोमल महेंद चित्रिव, (8)साक्षी पुरूषोत्तम खेडकर, (9)कोमल ओमशंकर माकोडे, (10)अनन्या सुरेंद्र नगरारे या विद्यार्थीनींनी लयबद्ध समर्पक मुद्रा व अभिनयाद्वारे स्त्री वेदना सादर केल्या. सांस्कृतिक कार्यक्रमाच्या इतक्या गंभीर विषयाला, हृदयस्पर्शी व मनोरंजक मनोवेधक बनविण्यासाठी या सांस्कृतिक कार्यक्रमात प्रत्येक ग्रंथाच्या सारनंतर डॉ. बाबासाहेबांच्या, बहुजन समाजाच्या वेदना रंगमंचावरून सादर करण्यास, गीतांची व त्यावरील नृत्यांची रचना करण्यात आली. सुचित्रा माटे व विद्यार्थी चमुने गीत सादर केले. गीतात प्रसिद्ध गायिका प्रतिभासींग बघेल, श्रेया घोषाल, सुरेश वाडकर, वैशाली माडे यांच्या भावपूर्ण गीतांची निवड करून त्याद्वारे बहुजन समाजाच्या व डॉ. बाबासाहेबांच्या वेदना व डॉ. बाबासाहेबांचे कार्य सादर करण्यात आले. 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' ही बोधिसत्व डॉ. बाबासाहेबांच्या मास्टर प्लान चा अंतिम कडी वर्ग 11 वी ची शिक्षिका मसरामने त्यांचे प्रास्तातिक करून 'दस सिंह राजाओ की कहानी' प्रास्ताविका सादरीकरण करण्यासाठी आचार्य चौधरी सर यांना आमंत्रित केले. आचार्यांनी कथन केले की डॉ. बाबासाहेबांनी बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथात धर्म आणि धम्म यातील भेद अगदी स्पष्टपणे सांगितले आहे. अशामुळे आपण धम्माला धर्म म्हणून संबोधितो. धम्म एक सुखी शांतीपूर्ण समृद्ध जीवनाचा मार्ग आहे. ज्याप्रमाणे एखाद्या व्यक्ती रस्त्यावरून कोणत्याही धर्म, पंथ आदींची व्यक्ती जावू शकते. तसेच धम्म मार्गाचे आहे. सारनाथ येथील प्रथम धम्म चक्कप्रवतन देसनेत तथागत देसना देतात की त्यांचा मार्ग धम्माचा मार्ग आहे. धम्म सामाजिक आहे. धम्माला इतर आत्मा कर्मकांड एवढेच काय पुढील जन्माशी काही घेणे देणे नाही. याच्या केंद्रस्थानी मनुष्य आहे. जीवीत अवस्थेत एका माणसाने दुसऱ्या माणसाशी कसा व्यवहार करावा जेणेकरून ते सुखी होतील हे धम्माचे कार्य असून दुःख मुक्ती हा त्याचा हेतू आहे. तथागताने सारनाथ येथे जी प्रथम धम्मचक्क पवत्तन सुत्ताची देसना दिली, त्यात पंचशील, अष्टांगमार्ग व दहा पारमिता समजावून सांगितल्या. या सारनाथ देसनेचे रूपांतरण सुधाकर चौधरींनी प्राणी (रूपक) कथेत करून त्याला नृत्यनाटीकेच्या रूपात केले व वर्ग 1 ते 6 च्या 65 बालकलाकारांनी 'द स्टोरी ऑफ टेन लॉयन' दस सिंह राजाओं की कहानी' या नृत्य नाटिकाद्वारा त्यांला रंगमंचावर साकार केले. स्क्राप्ट व दिग्दर्शन, रचना निर्मिती सुधाकर चौधरी, तर सहायक दिग्दर्शन समाधानी व विद्या या नृत्य नाट्याला तालबद्ध नृत्य व सकस ॲक्टींगच्या जोरावर खुशी कलाकार या विद्यार्थीनीने साकार केले. या 22 मिनिटारंच्या नृत्य नाटीकेद्वारा 65 बाल कलाकारांनी मनोवेधक अभिनय व जीवनदायी आशयातून प्रेक्षकांना धम्म राज्याची संकल्पना स्पष्ट केली. सर्व 108 कलावंत, सहायक दिग्दर्शक, नाट्य कॉस्ट्यूम, मेकअप कलावंतांना 100 ईयर प्री सेलिब्रेशनची सहभाग व गुणवत्ता प्रमाणपत्र प्रमुख अतिथींच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला. आभार प्रदर्शन मुख्याध्यापिका अर्शिया पठानने केले व अभिनंदनासह मास्टर प्लानची स्मृती घेवून गुणीजन हॉल बाहेर पडले. ■■

# शोध परिवर्तनाचा

## मधु मोहिते यांच्या आत्मकथनाच्या निमित्ताने




चळवळी जिवंत राहतात कार्यकर्त्यांच्या जोरावर. चळवळी विखुरतात कार्यकर्ते विखुरल्यावर. चळवळी नेतृत्वाच्या नावाने ओळखल्या जातात, परंतु चळवळीच्या पायाचे दगड आणि आधारस्तंभ असतात कार्यकर्ते. ते खूपदा अज्ञात किंवा अनुल्लेखित राहतात. कार्यकर्ते चळवळीच्या अंतर्बाह्य घटनांचे साक्षीदार असतात. परिवर्तनवादी चळवळीतील कार्यकर्ते आपल्या वैचारिक बांधिलकीतून अभ्यास करत स्वतःला घडवत चळवळीतील जन वकालत करत असतात. कित्येकदा नेत्यांच्या भूमिकेत राहून निर्णय घेऊन आघाडीवर संघटना पेलतात आणि तरी सुद्धा ते जमिनीवर असतात, सतरंज्या उचलताना त्यांना कमीपणा वाटत नाही. कारण खुर्चीची हवा त्यांना लागली नसते. अशा सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक परिवर्तनाच्या चळवळीत झोकून देऊन प्रमाणिकपणे आयुष्यभर कार्य करणाऱ्या एका पूर्णवेळ कार्यकर्त्याच्या नजरेतून गेल्या पन्नास वर्षांच्या काळातील परिवर्तनाच्या पाऊलखुणांचा मागोवा म्हणजे अलीकडेच प्रकाशित झालेले मधु मोहिते यांचे पुस्तक म्हणजे 'शोध परिवर्तनाचा.'

स्वातंत्र्योत्तर काळातील सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय परिवर्तनांचा काळ 1970 च्या दशकात सुरू झाला. गेल्या अर्धशतकात या परिवर्तनवादी चळवळीने अनेक चढ उतार पाहिले. अशा चळवळीत ज्यांनी स्वतःला रुजवून आणि रुतवून घेतले, अशा एका फुले-आंबेडकरवादी, गांधी -लोहियावादी, सामाजिक आणि राजकीय परिवर्तनवादी चळवळीतील कार्यकर्ते मधु मोहिते. त्यांचे शोध परिवर्तनाचा हे समकालीन चळवळीत नेतृत्वालाही दीपस्तंभ ठरेल अशी अनुभवांची शिदोरी आणि वैचारिक अंजन डोळ्यात घालणारे असे हे पुस्तक नुकतेच ग्रंथालीने प्रकाशित केले.

2025 साली अनेक चळवळींना 50 वर्षे पूर्ण होत असल्याने आता अशी ग्रंथमाला कदाचित अनेक लेखक गुंफतील. त्या ग्रंथमालेतील या वर्षीचे पहिले पुष्प म्हणजे 'शोध परिवर्तनाचा.' या आत्मकथनाचे वैशिष्ट्य असे की, महाराष्ट्रातील परिवर्तनाचा शोध घेताना मधु त्याच्या बालपणापासून या प्रवासात आपल्याला सोबत घेतो आणि त्याच्या आयुष्यातील जनांन्दोलने आपण त्याच्या कॅलिडोस्कोप मधून आपण बघतो. जर तुम्ही स्वतः चळवळीतील कार्यकर्ता असाल तर तुम्हाला तुमच्या भौगोलिक स्थानावरून समांतर समकालीन असा घटना पट उलगडत जाऊन तुम्ही आपल्या संघटनेचा मागोवा घेऊ लागता. नॉस्टॅल्जिक करून भूतकाळात अनेक आत्मचरित्रे, चरित्रे आपल्याला नेतात, खिळवून ठेवतात. पण मधुचे हे पुस्तक आत्मचरित्र न ठरता चळवळ चरित्र होते आणि आपण त्यात कुठे कुठे सहभागी होतो असे मॅपिंग नकळत आपण करू लागतो. शिवाय लेखक खरेच परिवर्तनाचा शोध घेत असल्याने हे पुस्तक तुम्हाला त्या घटनांमध्ये गुंतवून न ठेवता तुम्हाला सतत काळाच्या पडद्यावर चळवळीत झालेल्या अनेक स्थित्यंतरांची दखल घ्यायला लावते. खऱ्या अर्थाने मूव्हमेंटमय व्हायला होते. जे कार्यकर्ते या चळवळीत प्रत्यक्ष सहभागी व सक्रिय होते किंवा ज्यांचा थोडातरी हातभार लागला आहे त्यांना आपण केवढा लांबचा पल्ला गाठला आहे याची सुखद जाणीव करून देते. आपल्या प्रदेशातील राज्य किंवा राष्ट्रीय पातळीवरील नेतृत्वाचे योगदान, रणनिती आणि आपली वैयक्तिक गुंतवणूक याच्या संमिश्र आठवणी जाग्या करते. आपल्या नेतृत्वाच्या कधी कधी घेतलेल्या चुकीच्या निर्णयांनी किंवा अनेक हितसंबंधी राजकीय समीकरणांनी संघटना तुटल्या, मोठी आंदोलने फसली, नेते मोठे झाले. पण आंदोलन ठिय्या झाले किंवा या देशातील व्यवस्था परिवर्तनाच्या संघर्षाचे बिकट पर्वही यातूनच सुरू झाले हे वास्तव सुद्धा प्रखरपणे समोर ठेवते.

वैयक्तिक, सामाजिक, सांस्कृतिक, पर्यावरणीय, प्रादेशिक, सांप्रदायिक, धार्मिक आणि राजकीय अशा विविध पातळ्यांवर चाललेल्या स्त्रियांच्या, दलितांच्या, शेतकरी, आदिवासी, भूमिहीन, संघटित मजूर अशा अनेक तळागाळातील लोकांच्या जगण्याच्या संघर्ष गाथा उकलताना लेखक त्यात कोणती भूमिका जगत आला आहे हे कळते. त्यामुळे जिथे घटना घडल्या तेथील एरवी बिन चेहऱ्यांची माणसे, ही फक्त मोर्चा, धरण्यातील गर्दी न राहता आपल्याला त्या गाव, वस्ती, मोहल्यासकट लक्षात राहतात, कारण आपले सहकारी म्हणून दखलपात्र अशी चेहरे असलेली व्यक्तिमत्व म्हणून नावांसकट लेखक त्यांना या पुस्तकात अधोरेखित करून ठेवतो.

हे पुस्तक वाचताना खूपदा जाणवते की किती विखारी आणि माणसांवरचा विश्वास उडेल असे प्रसंग सुद्धा त्याच्या वाट्याला आले, पण तो कडवट झाला नाही. अतिशय रसरसून, जीगीविषेने आयुष्याला सामोरे जातो, त्याचे एक कारण आहे. त्याला मिळालेले त्याच्या साथीदारांचे निरपेक्ष प्रेम आणि निर्व्याज मैत्री. त्याला आयुष्यभराची कणखर साथ देणाऱ्या, निर्मळ प्रेम करणाऱ्या माधुरी समेळ सारख्या जोडीदारामुळे त्याची ही वाट सुकर झाली. खरेतर माधुरीच्या शिक्षकी पेशा व स्वभावामुळे गेल्या सतरा वर्षांपासून चाललेल्या त्याच्या या लेखनाचा, टिपण वह्यांचा संग्रह तिने जतन करून ठेवला. अंतिम रूप देण्यासाठी अशा सतत चळवळ भूमीत मन आणि पाय दोन्ही असणाऱ्याला कार्यकर्त्याला पकडून त्याच्याकडून शेवटी पुस्तक पूर्ण करून घेण्याचे कामही तिचेच. पूर्ण वेळ कार्यकर्त्या स्त्री पुरुषांच्या वाट्याला असे जोडीदार आले तर आयुष्याच्या अखेरीस सहजीवनाची शहाणीव उरते. ती आपल्याला या पुस्तकात उतरलेली दिसते. एका पूर्णवेळ कार्यकर्त्यांचा जगण्यावरचा अद्म्य असा विश्वास कायम ठेवण्यात तिच्या किंवा त्याच्या साथीदारांचा परस्परांशी असलेला सुसंवाद मुख्य भूमिका निभावतो. मधू एक ठिकाणी लिहितो, की तो कुठेही गेला तरी स्वतःची जागा निर्माण करेल असा माधुरीला विश्वास होता. सामाजिक संघटनेत काम करताना पैशांची चणचण, पोटाला चिमटा, अपुरे आणि अनियमित मानधन याची माधुरीला कल्पना होती. त्यासाठी तिने परोपरीने मदत केली होती. परंतु राजकीय पक्षात गेल्यावरही तीच परिस्थिती बघितल्यावर थोडा वेळ अबोला धरलेली तीच मग त्याची समजूत काढायची. अरे आपला संसार चालवताना किती अडचणी आहेत, मुलाला पाळणाघरात ठेवायचे, त्याचे पैसे, घरमालकाचा तगादा, अरे तुझा इतर खर्च माझ्यावर टाकत जाऊ नकोस. तुझी बांधिलकी, तगमग, धोके पत्करण्याची, कष्ट करण्याची तयारी मी पाहतेय म्हणून तू हे काम करत रहावस मला वाटते. ....मधु म्हणतो, 'मी पैसे घेऊन, तिला आलिंगन देऊन, लगेच रेल्वे किंवा बसने पक्षाच्या कार्यासाठी बाहेर पडायचो.' त्याला जाणवायचे की तो स्वार्थीपणा करतो, परंतु दुसरा पर्याय नव्हता. तो पुढे लिहितो की, ही अशी तगमग जवळपास सर्वच फुल टाइमर्सची असायची. पण एक गोष्ट मात्र खरी की माधुरी सारखे जोडीदार अपवादात्मक.

स्त्री दास्याचा तुरुंग फोडते....



लता प्रतिभा मधुकर
मो. 9922320338

विशेषतः स्त्रिया फुल टाइमर्स असल्या की त्यांची कसरत जोडीदार शहाणे नसतील तर गृहिणी, कार्यकर्ता आणि जोडीला आपल्या व मुलांपुरते अर्थार्जन अशी तिहेरी कसरत असायची. या पुस्तकात मधुने दलित पँथर सारख्या आंबेडकरी चळवळीपासून, युक्रांद, संघर्ष वाहिनी, सर्व कम्युनिस्ट पक्ष व विद्यार्थी संघटना, सेवा दल, रिपब्लिकन पक्ष, जनता दल, श्रमिक संघटना, भुमीसेना, छात्र भारती, आदिवासी, ओबीसी, भटके विमुक्त संघटना, अशा विविध संघटनामधील स्त्रियांच्या कामाचा उल्लेख करत नामनिर्देश करून ठेवल्यामुळे अगदी महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यात पुरुष कार्यकर्त्यांच्या एवढ्याच ताकदीने काम करणाऱ्या अनेक विस्मृतीमध्ये गेलेल्या स्त्रियांना ऐतिहासिक स्मृती कोशात परत आणले आहे आणि हे मी पुढे विशद केलेल्या मधु मोहितेच्या जगण्यातील स्त्रीवादी असण्याचे आणि त्यांच्यासोबत सातत्याने कार्य करत असतानाच्या तयार झालेल्या लिंगभावा पलीकडे जाऊन तयार झालेल्या मैत्रीचे द्योतक आहे. असे उल्लेख पुस्तकभर आहेत आणि त्यातून समकालीन परिवर्तनाच्या लढाईतील स्त्री कार्यकर्त्यांची सन्माननीय दखल इतर पुरुष कार्यकर्त्यांप्रमाणे त्याने घेतली आहे, असे म्हणावे लागेल.

खरे तर आयुष्याचा एवढा मोठा पट मांडत असताना सोबत परिवर्तन कसे घडत गेले याचे विश्लेषण करण्याचा मोह लेखकाने टाळला आहे, ती एक जमेची बाजू आहे. त्यामुळे घटना जशा त्याच्या समोर घडल्या, त्याला दिसल्या, त्याच्यावर परिणाम करून गेल्या, अशा आनंद, दुःख, क्षोभ, प्रेम, मैत्र, करुणा अशा अनेक भावनांचा त्या घटनांशी जैविक संबंध न तोडता मधु लिहित जातो. म्हणून त्या भावनेसकट ती घटना, ती व्यक्ती, ती माणसे, अगदी घरातला उमदा सदस्य असा त्यांचा देखणा बैल, शेती, लावणी, बाजार वगैरे सुद्धा आपल्यासमोर जिवंत होतात. त्याच्या आयुष्यातील कोकण, मुंबई, राशीन, उंबरे, खालापूर अशी अनेक गावे तेथील परिसर आणि माणसे, त्यांच्या माणूसपणाच्या वेगळ्या छटा आणि परस्पर मानवी संबंधातून तयार झालेले रक्ता पलीकडील नाती आपल्याला भेटतात आणि ती मधुच्या चष्म्यातून किती वेगवेगळ्या रूपात बघता येतात हे आपल्याला कळते. कारण मधु एक चित्रकार असल्याने त्याची लेखन शैली चित्रदर्शी आहे. एखाद्या चित्रपटाप्रमाणे आपण त्याचे चळवळीतील संघर्षमय अद्भुत असे जीवन बघण्यापूर्वी त्याच्या बालपणात ही रमून जातो. हरखून जातो.

**माखजन डेज : मधुचे अल्लड बालपण :-**

आर. के. नारायणन यांच्या मालगुडी डेज सारखी मधूच्या या पुस्तकातील पहिली चार प्रकरणे आपल्याला माखजनमध्ये घेऊन जातात. आज अगदी अपूर्वाई वाटावी अशी मुस्लिम हिंदू धर्माची एकत्र संस्कृती दर्शविणाऱ्या गोष्टी लेखकाच्या गावात आहेत. आपण आजवर वाचलेल्या कोकणातील मोठमोठ्या लेखकांच्या पुस्तकात येत नाहीत तसे गाव संदर्भ यात येतात.

क्रमशः ■■

# आईच्या स्मृतीप्रित्यर्थ बुद्धमूर्ती दान देण्यासारखे पवित्र आणि मंगलमय दुसरे दान नाही : आनंद म्हस्के

**सांगली :** प्रज्ञा, शील, करुणा आणि समाधी यांची सांगड घालून समता, स्वातंत्र्य, बंधुत्व आणि सामाजिक न्यायाने संपूर्ण मानव जातीचे कल्याण होण्यासाठी डॉ. बाबासाहेब यांनी संविधानाच्या पाना पानावर बुद्ध पेरला आहे. म्हणून लोकशाही जगाला बुद्ध आणि संविधान हवे आहे. अशा तथागत गौतम बुद्ध यांची मूर्ती आईच्या स्मृतीप्रित्यर्थ गावच्या विहारला दान करण्यासारखे पवित्र दान दुसरे कोणते नाही. असे आंबेडकरी विचारवंत साहित्यिक आनंद म्हस्के आपल्या भाषणात म्हणाले.




सांगली जिल्हा तालुका खानापूर वाझर गावातील बुद्ध विहारास आई स्मृतीशेष समाबाई आबा काळबाग यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आशा भीमराव कालबाग या उभयतांनी तथागत गौतम बुद्ध यांची मूर्ती दान दिली. तर डॉ. पी.एस कांबळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मूर्ती दान देण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष आनंद म्हस्के होते. यावेळी विद्रोही चळवळीचे धनाजी गुरव, मराठा सेवा संघाचे अमृतराव सूर्यवंशी, भारतीय बौद्ध महासभा जिल्हा अध्यक्ष रुपेश तासगावकर, रवी लोंढे, ॲड. सुगंध वाघमारे, ॲड. के.डी. कांबळे आदी मान्यवरांची भाषणे झाली.

धम्मभूमी गुगवाडचे भंते गोविंदो मानदो यांच्या हस्ते तथागत बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्तीची बुद्ध विहारात विधिवत प्रतिस्थापना करण्यात आली. प्रतिस्थापना अगोदर वाझर गावातून तथागत बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांची रथातून मिरवणूक काढण्यात आली. त्यामध्ये माजी सरपंच संजय (बापू) जाधव, माजी उपसरपंच विनायक जाधव, उपसरपंच मनेश सूर्यवंशी, श्रीनाथ सहकारी सोसायटी माजी चेअरमन शिवाजी यशवंत जाधव, माजी उपसरपंच हनुमंत (नाना) जाधव, वाजराई सहकारी सोसायटी संस्थापक चेअरमन सुधीर बाबुराव जाधव, वाजरगावचे पोलीस पाटील उदय बाबुराव जाधव, पत्रकार तरुण भारत संग्राम कदम, संघर्ष मित्र मंडळाचे कार्यकर्ते उपासक उपासिका मोठ्या प्रमाणात पांढरे वस्त्र परिधान करून सहभागी झाले होते. पाहुण्यांचे भीमराव काळेबाग, शशिकांत काळेबाग, प्रदीप होवाळ, शिवाजी कांबळे, गौतम काळेबाग, बजरंग काळेबाग, राहुल काळेबाग, नितीन काळेबाग, जितेंद्र सावंत, संदीप होवाळ, विकास होवाळ, सुबराव काळेबाग, सर्जेराव काळेबाग, भास्कर होवाळ, अतुल गाडे आणि भीमराव काळेबाग यांच्या हस्ते जाहीर सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे संचालन प्रज्ञा सावंत, शंकर कांबळे यांनी केले.

## आलोक बुद्ध विहार त्यागमुर्ती रमाई आणि माईसाहेब यांना अभिवादन



**नागपूर :** त्यागमूर्ती रमाई आणि माईसाहेब यांचा स्मृती दिवस आलोक बुद्ध विहार जुना बगडगंज रमाई (हृद्धअ) गार्डन समोर. गुरुवार दि. 29/5/2025 रोजी सायं. 7 वाजता आयोजित करण्यात आला आहे.

मुख्य मार्गदर्शक हरिदास बेलेकर, कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्ञानदेव गजभिये, विशेष उपस्थिती राजकुमार वंजारी, मिलींद डांगे, मनोहर उके आदी उपस्थित राहणार आहेत, असे जासुंद पाटील यांनी कळविले आहे.

## बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे जन्म शताब्दीनिमित्त परिसंवाद

### पत्रकारिता, आंबेडकरी चळवळ आणि आजचे वास्तव विषयावर परिसंवाद



**नागपूर :** बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे जन्मशताब्दी महोत्सव समितीद्वारा आयोजित विशेष परिसंवाद पत्रकारिता, आंबेडकरी चळवळ आणि आजचे वास्तव. शुक्रवार, दि. 30 मे 2025 रोजी, सायंकाळी 4.00 वा. स्थळ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटर, नागार्जून सभागृह, कामठी रोड, नागपूर. कार्यक्रमाचे अध्यक्ष :प्रा. अशोक गोडघाटे, रिपब्लिकन नेते तथा विचारवंत, विशेष अतिथी : आमदार डॉ. नितीन राऊत, व्याख्याते : प्रा. रणजीत मेश्राम, ख्यातकीर्त पत्रकार तथा विचारवंत संपादक, श्रीमंत माने दैनिक लोकमत, नागपूर. प्रा. डॉ. शैलेंद्र लेंडे, मराठी विभाग प्रमुख, रा.तु.म. नागपूर विद्यापीठ तथा साहित्य समीक्षक आदी उपस्थित राहणार आहेत.

आंबेडकरी आंदोलनाचे राष्ट्रीय नेते, रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष राज्यसभेचे माजी उपसभापती तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मानसपुत्र, बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त जन्मशताब्दी महोत्सवांतर्गत 'विशेष परिसंवाद' आयोजित केला आहे. करिता या समाज जागरण अभियानात आपण आवर्जून सहभागी व्हावे असे बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे जन्मशताब्दी महोत्सव समिती नागपूर यांनी कळविले आहे.




## मातोश्री रमाई बुद्ध विहार आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालय

मातोश्री रमाई बुद्ध विहार आणि वर डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालय आहे. भंते धम्मप्रकाश वास्तव्याला आहेत. दररोज सायंकाळी सात वाजता वंदना, भिक्षू संघदान, भोजनदान, महामानवाच्या जयंती, स्मृतिदिन पाळले जातात. मुलांचे बालसंस्कार शिबिर, सांस्कृतिक खेळ, धम्म प्रशिक्षण, इंग्रजी वर्ग, पालीभाषा परीक्षा, आरोग्य, रक्तदान, नेत्र शिबिर होतात. माया जामगडे, सुशिला नाईक, अलका झोडपे, सरिता झोडापे, बागेश्वर, शोभा खोब्रागडे, प्रमिला नाईक, वेणू कुतरमारे, गीता बुलकुंडे आणि प्रशांत, ऋत्विक, अमित, बबन बुलकुंडे यांचे विशेष सहकार्य असते.

संवाद मित्र, सी.एन. शेंडे,
मो. 9325636298

## महत्वाचे

### भारतीय बौद्ध महासभेचे मुख्य कार्यालयात माता रमाई यांना अभिवादन



**नागपूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर चॅरिटेबल ट्रस्ट, हरदास नगर, उत्तर नागपूर, कांडप मशीन जवळ. भारतीय बौद्ध महासभा (समता सैनिक दल) भारतीय बौद्ध महासभेचे मुख्य कार्यालयात त्यागमूर्ती माता रमाई यांचा 90 व्या स्मृतीदिनानिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रमुख मार्गदर्शक प्रमुख पाहुणे उषा बौद्ध, भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय संघटक इंजिनिअर पद्माकर गणवीर, जे.आर. गोडबोले यांनी माता रमाई यांच्या स्मृतिदिनानिमित्त अत्यंत महत्वपूर्ण मोलाचे मार्गदर्शन उपासक उपासिका यांना केले. प्रमुख उपस्थिती डॉ. बाबासाहेब आंबेडकर चॅरिटेबल ट्रस्टीचे सचिव भगवान कांबळे, विजय मेश्राम, विनय ढोके, नरेंद्र थुल, शुद्धोधन धाबर्डे, पंचशीला सहारे, गीता जांभूळकर, सरोज खोब्रागडे, सुधा मेश्राम, रमा गोडबोले, माया मेश्राम, रमा सोमकुवर, संध्या पाटील, साधना सोमकुवर, इत्यादी कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संचालन विशाखा लोखंडे यांनी केले तर आभार गीता जांभूळकर यांनी मानले.

### त्रिशरण बुद्ध विहारात माता रमाई यांना अभिवादन



**नागपूर :** माता रमाई यांच्या 90, व्या स्मृती दिनानिमित्त एका कार्यक्रमाचे आयोजन त्रिशरण बुद्ध विहार बालाजीनगर विस्तार येथे करण्यात आले होते. डॉ. एम. एस. जांभूळे यांनी रमाईने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना प्रत्येक क्षेत्रात कशी मदत केली याची माहिती दिली. रमाईच्या योगदानामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जगात कीर्ती झाली असेही त्यांनी सांगितले. जया कलीहारी, प्रा. पुष्पा सोमकुवर, करुणा सोनटक्के यांनी रमाईच्या कार्याची माहिती दिली व आदरांजली वाहिली. मंगला जांभुळे, चंद्रकला रामटेके व उपासक उपासिका कार्यक्रमाला उपस्थित होत्या. वाचनालयातील विद्यार्थीनी प्रगती चव्हाण हिने संचालन केले तर रंजना मेश्राम यांनी आभार मानले.

## आजचे कार्यक्रम

### राष्ट्रीय बौद्ध महासभा नागपूर युनिट

दिनांक : गुरुवारी दि. 29/05/2025
वेळ : सायंकाळी ७ वाजता
स्थान : भीमोदय बुद्ध विहार, विश्वकर्मा नगर, नागपूर
विषय :- भन्ते धम्मसारथी यांचे 'बुद्ध और उनका धम्म' या विषयावर प्रबोधन.



## खासदार प्रफुल पटेल यांनी घेतला जिल्हा निहाय्य आढावा

**नागपूर :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने परवाना भवन, नागपूर येथे आयोजित विदर्भ स्तरीय पक्ष पदाधिकारी व कार्यकर्ता मेळाव्याला खासदार प्रफुल पटेल यांनी मार्गदर्शन केले. यावेळी विदर्भातील जिल्हा निहाय्य पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या बैठका घेत प्रत्येक जिल्ह्यातील पक्षाच्या संघटनात्मक परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. आगामी काळात महानगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायत व ग्रामपंचायतच्या निवडणूक होऊ घातल्या असल्याने कार्यकर्त्यांसोबत आगामी निवडणुकांच्या संबंधाने सविस्तर चर्चा खा. प्रफुल पटेल यांनी केली व मेळाव्याला असलेला कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद निश्चितच पक्षाला बळकटी देणारा ठरणार आहे. जनतेच्या समस्या व अडी अडचणी समजून घ्या, जेणे करून सामान्य माणसाला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष जनमानसाचा आहे याची जाणीव झाली पाहिजे. सभासद नोंदणी अभियान त्वरित राबविणे, जास्तीत जास्त लोकांना पक्षाशी जोडून संघटन मजबूत करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. यावेळी माजी मंत्री धर्मरावबाबा आत्राम, आमदार संजय खोडके, माजी आमदार राजेंद्र जैन, आमदार सुलभा खोडके, आमदार राजू कारेमोरे, आमदार मनोज कायंदे, यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ता मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जन्मोत्सव समितीच्यावतीने 31 मे रोजी 300 वा जयंती सोहळा



**नागपूर :** अहोरात्र जनतेसाठी झिजणाऱ्या अहिल्यादेवी होळकर अखेरपर्यंत जनतेसाठी लढल्या. त्या राष्ट्रमातेचा 31 मे, हा जन्मदिवस आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करूनच कार्यक्रमाला सुरुवात होईल. अहिल्यादेवी महिला मंडळ नागपूर व धनगर युवक मंडळ आणि सर्वसमावेशक धनगर समाज संघटनेच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची त्रिशताब्दी जन्मोत्सवा निमित्ताने दिनांक 31 मे 2025 रोजी, शनिवारी दुपारी 3 वाजता. उपरोक्त मंडळाच्या बालाजी नगर येथील कार्यालयापासून रॅली व शोभायात्रा आयोजित केली असून ही रॅली वेणू कॉर्नर, मानेवाडा रोड मार्गे मानेवाडा चौक, ओंकार नगर चौक, नरेंद्र चौक, छत्रपती चौक, खामला चौक, देव नगर मार्गे राजीव गांधी चौक, चुनाभट्टी मार्गे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक, अजनी रेल्वे स्टेशन येथे संध्याकाळी 6 वाजेपर्यंत पोहोचेल व तेथे समारंभ होईल. समारोपिय कार्यक्रमात राजकीय व सामाजिक नेते मार्गदर्शन करतील आणि भोजन दाननंतर कार्यक्रमाचा समारोप होईल. समाजातील कार्यकर्त्यांनी समाज बांधवांनी, भगिनींनी या रॅलीमध्ये, शोभायात्रेत पिवळ्या रंगाचे वस्त्र परिधान करावे, प्रत्येकानी आपापली बाईक आणावी आणि सर्व समाज बांधवांनी वाहतुकीचे नियम पाळूनच बाईक रॅलीमध्ये यशस्वी करावी. या बाईक रॅलीत जास्तीत जास्त मोठ्या संख्येने उपस्थित राहून समाजाचे ऋण फेडावे. अशी आग्रहाची विनंती आयोजकांनी केली आहे. धनगर युवक मंडळ नागपूरचे अध्यक्ष रमेश देवाजी पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## रत्नागिरी जिल्ह्याला माई रमाईचे नाव देऊन त्यागाचा सन्मान करावा : रामभाऊ वाहणे



**नागपूर :** राज्य शासनाने औरंगाबाद, उस्मानाबाद, अहमदनगर जिल्ह्याचे नामांतर केले. आम्ही साखर वाटून तोंड गोड केले. त्याच धर्तीवर आता त्यागमूर्ती माई रमाई आंबेडकर यांचे नाव रत्नागिरी जिल्ह्याला देऊन त्यागमूर्तीच्या शासनाने सन्मान करावा असे प्रतिपादन आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाचे नेते रामभाऊ वाहणे यांनी केले. ते आज माई रमाई यांच्या पुण्यतिथीनिमित्त पुण्यस्मरण करतांना अध्यक्ष स्थानावरून बोलत होते. प्रमुख वक्ते म्हणून नामदेवराव निकोसे यांनी माई रमाईची जिवनगाथा सांगितली. तेव्हा श्रोत्यांच्या डोळ्यात अश्रू अनावर झाले होते. आंरिमोचे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे यांनी माई रमाई यांच्या छायाचित्रावर पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. मनोहर इंगोले यांनी दिप प्रज्वलन केले. धर्माजी बागडे यांनी याप्रसंगी माई रमाई अमर रहे या घोषवाक्याने परिसर दणाणून सोडले.

रत्नागिरी जिल्ह्याला माई रमाईचे नाव देण्यात यावे. याकरिता लवकरच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना शिष्टमंडळ भेटून निवेदन सादर करण्यात येईल. असे नारायण बागडे यांनी सांगितले. कार्यक्रमाचे संचालन शहराध्यक्ष प्रा. रमेश दुपारे यांनी तर आभार सुरज ढोणे यांनी मानले. कार्यक्रमात पुण्यशील बोदले, चरणदास गायकवाड, अभिषेक मिश्रा, राहूल त्रिवेदी, भागनबाई मेश्राम, महानंदा इलमकर, संगिता वासनिक, रोहीत पांडे, शालिक बांगर, मामासाहेब मेश्राम, राजु पांजरे उपस्थित होते.

## शाक्य महाबोधी विहारात बुद्ध वैशाख पौर्णिमा



**नागपूर :** शाक्य महाबोधी विहार आऊटर रिंग रोड, जबलपूर हायवे, हिंदुस्थान धाबा, भारत पेट्रोलपंप येथे प्रथमच तथागत गौतम बुद्धाची 2568 वी जयंती व बुद्ध वैशाख पौर्णिमा कार्यक्रम शुक्रवार दि. 16/05/2025 ला सकाळी 9 वा. घेण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन तेथील सुखदेव पळसपगार, गरीबदास गजभिये, राजेश माटे यांनी जागा उपलब्ध करून शिल्पा मकेश्वर यांनी कार्यक्रम मोठ्या जल्लोशात सादर करण्यात आला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून राजूभाऊ वैद्य(समाजसेवक) व माजी सरपंच हुडकेश्वर गावातील शेंडे होते. तसेच कार्यक्रमाला मार्गदर्शक विजय वाघमारे होते. कार्यक्रमाचे संचालन मुकबधिर शाळेचे प्रमुख शिक्षक संजय गवई यांनी केले. रेश्मा सहारे व सिकलसेल इंटरनॅशनल लेवलचे कार्य करणारे डोंगरे यांचे या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शन लाभले. गौतम डोंगरे यांनी सिकलसेल व बुद्ध जयंती बद्दल सांगितले. राजाभाऊ वैद्य, माजी सरपंच शेंडे, विजय वाघमारे यांनी मार्गदर्शन केले. संचालन संजय गवई यांनी केले. तर रेशमा सहारे यांनी एमपीएससी, यूपीएससी शिक्षणाचे क्लास सुरू झाले पाहिजे असे सुचविले. सगळ्यांनी एकत्र आणण्यासाठी शिल्पा मकेश्वर यांचे योगदान मिळाले. भा.वि. वाघमारे, गजभिये, जया मुगले यांनी प्रसाद गीत म्हटले. शोभा वाघमारे व ऊषा पळसपगार यांनी खीर वाटप केले. कार्यक्रमात उपस्थित असणारे मंदा शंभरकर, मंदा खरतड, चव्हाण व बाल चमू यांनी कार्यक्रमास मदत केली. ऊन-सावली पंचशीलेच्या व पिंपळ वृक्षाखाली कार्यक्रम झाला.



## बसपातर्फे मातोश्री रमाई व माई यांच्या स्मृतिदिनी अभिवादन

**नागपूर :** बहुजन समाज पार्टीच्या वतीने उत्तर नागपूरच्या यादव नगरातील बहुजन हिताय बुद्ध विहार परिसरात असलेल्या रमाईच्या भव्य पुतळ्याला तसेच सविता आंबेडकरांच्या फोटोला बसपा नेते उत्तम शेवडे माझी नगरसेविका वैशाली अविनाश नारनवरे यांनी माल्यार्पण करून अभिवादन केले. आज मातोश्री रमाई आंबेडकर यांचा 90 वा व सविता आंबेडकर यांचा 22 वा स्मृती दिवस असल्याने कही हम भूल न जाये या राष्ट्रीय अभियानांतर्गत संयुक्तरीत्या साजरा करण्यात आला. मातोश्री रमाई आंबेडकरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसोबत 1998 पासून 1935 पर्यंत सलग 37 वर्षे घालविली. या दरम्यान डॉ. बाबासाहेबांचे शिक्षण, उच्च शिक्षण, महाडचे आंदोलन, गोलमेज परिषदा आदि कार्यात रमाईचे योगदान आहे. दरम्यान बसपाचे महाराष्ट्र प्रदेश मीडिया प्रभारी उत्तम शेवडे यांनी मत व्यक्त केले. याप्रसंगी प्रामुख्याने जितेंद्र घोडेस्वार, गौतम पाटील, मोहम्मद इब्राहिम, चंद्रशेखर कांबळे, अभिलेश वाहाने, विलास सोमकुवर, राजेश चांदेकर, राजेश नंदेश्वर, जगदीश गजभिये, बुद्धम राऊत, सिद्धार्थ पोफरे, नरेश मेश्राम, बलवंत राऊत, संघर्ष वानखेडे, पवन खोब्रागडे, राकेश नांदगावकर, तसेच उत्तम चहांदे आदि प्रामुख्याने उपस्थित होते.

## सत्ताधारी आमदारांचे घरात भाई रजनीकांत यांनी केला सत्याग्रह



**नागपूर :** महाराष्ट्रात सर्वच पक्षाचे आमदार व मंत्र्यांचे शरीरास हानीकारक असणाऱ्या देशी, विदेशी दारुचे कारखाने आहेत, ती दारु विकण्यासाठी महाराष्ट्रातील दारुबंदी कायदा 1963 मधे तोडण्यात आला व राज्यात लाडक्या बहिणींचे नवरे व मुलांना दारु पाजण्यासाठी, महिला धोरणाविरोधी, दारुचे कारखाने, दारु दुकाने काढलीत व छत्रपती शिवराय दैवत असणारे महाराष्ट्र राज्य, हे राज्यकर्त्यांनी आज मद्यराष्ट्र बनविले आहे. ही विटंबना व कोट्यावधी महिलांचे संसार उध्वस्त करणारे, त्यांचे नवरे, मुले दारु व्यसनात खंगत मारण्यांचे, विध्वंसक धोरण रद्द करावे, असे लेखी निवेदनात बजावले, गुजराथमधे भाजपचे सरकार आहे, दारुबंदी कायदा तेथे आहे आणि तेथे सार्वत्रिक विकास होत आहे, महाराष्ट्रात भाजपचे सरकार आहे, मग येथेही दारुबंदी करण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली. अन्यथा सत्ताधारी आमदारांचे विरोधात दारुग्रस्त महिलांचे आंदोलन करण्याचा ईशारा भाई रजनीकांत यांनी दिला. त्यांचे हे लक्ष्यवेधी व्यक्तीगत सत्याग्रही आंदोलन आहे व ते महाराष्ट्रातील ईतर जिल्ह्यातील सत्ताधारी महिला व पुरुष आमदारांचे निवासस्थानी राबविण्यात येईल, असे त्यांनी सुचित केले. अमरावतीला श्रीधर भिसे, संघटक, कैलास कुलट भास्कर उचितकर हे दारु मुक्ती आंदोलनाचे कार्यकर्ते निवेदन आमदारांचे स्विय सचिव अमित तायडे यांना दारुमुळे 12 गंभीर आजार व शरीरावर होणारे दुःष्परिणामांचे चित्र आमदारांना माहितीसाठी प्रदान केले तेव्हा भाई रजनीकांत उपस्थित होते.

## कर्मयोगी गाडगेबाबा महानाट्याचे दमदार सादरीकरण

**नागपूर :** 'कृती थिएटर ॲण्ड स्पोटर्स अकादमी संस्था,' नागपूर द्वारा प्रस्तुत 'कर्मयोगी गाडगेबाबा' या महानाट्याचे आयोजन सुरेश भट सभागृहात शनिवार दि. 24 मे 2025 रोजी सायंकाळी सादर करण्यात आले. प्रा. विठ्ठल घोडे लिखीत या महानाट्यात विदर्भातील सत्तराहून अधिक कलावंतांनी आपआपल्या भूमिका यथोचित पार पाडल्या, नृत्य कलावंतांनी विशेष प्रभाव पाडला. या महानाट्याचे निर्माते विजय गायगवळी(मुंबई) हे असून या महानाट्याचा हा विशेष प्रयोग नागपूरच्या रसिकांसाठी आयोजित केला होता. या पंधराव्या प्रयोगानिमित्त दिग्दर्शक शितल दोडके यांनी समाजाला कलेच्या माध्यमातून प्रबोधन देण्याचा आणि सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यात मोलाचा वाटा उचलणारे कला उपासक नटश्रेष्ठ प्रभाकर आंबोणे तसेच कलाश्रेष्ठ वत्सला पोलकमवार-आंबोणे यांचा त्यांच्या कला जीवनातील प्रवासाबद्दल, उद्घाटक डॉ. निलकांत कुलसंगे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. अन्य सत्यकारमुर्ती सुरेंद्र उके सामाजिक कार्यकर्ता एस.टी. महामंडळ, भंडारा तर कवयित्री प्रणाली चव्हाटे ज्यांनी समाजावर चार हजार कविता लिहून सादर करण्याचा विक्रम केला. याप्रसंगी जेष्ठ नाट्य कलावंत रूपराव कामडी प्रामुख्याने उपस्थित होते. मुख्य म्हणजे प्रभाकर आंबोणे व रूपराव कामडी यांनी गाडगेबाबांची भूमिका साकारली होती. या नाटकात गाडगेबाबा या पात्रासाठी आंबोणे यांचा आवाज तर सखू (गाडगेबाबांची आई) या पात्राला वत्सला पोलकमवार यांनी आपला दमदार आवाज दिला. या महानाट्यात प्रमुख व्यक्तीरेखा म्हणजे गाडगेबाबा. डॉ. भिमराव आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. खेर (मुंबईशल्य), मुख्यमंत्री,



मराठी दैनिकाचे संपादक प्रल्हाद केशव अत्रे यांची पात्र व त्यांचे विचार व संघर्ष या महानाट्यात त्याचा आवर्जून उल्लेख करण्यात आला आहे. नाटकाची दमदार सुरूवात शाहिराच्या पोवाड्याने होते. या नाटकात शाहिर आपल्या पोवाड्यातून एका एका प्रसंगाची मांडणी करित असतो.

त्याप्रमाणे जिवंत करण्याचे काम दिग्दर्शक शितल दोडके यांनी केले. भरगच्च सभागृह अनेक प्रसंगात भावविभोर झाल्याचे जाणवले. या महानाट्यात भक्तीगीत, अभंग, भारत मातेचे गीत(नृत्य), अस्सल वैदर्भिय गीत 'आंधळेकू पैसा' या गीतांनी प्रेक्षकांची मने जिंकली. गाडगेबाबांच्या प्रमुख भुमिकेत सिने/नाट्य कलावंत बिस्मार्क भिवगडे यांनी आपल्या सहज सुंदर अभिनयाने प्रेक्षकांना खिळवून ठेवले. विशेषतः तरूण आणि बालकांनी गाडगेबाबांच्या वेशभूषेलाही कौतूकाने दाद दिली. त्यांना या वेशभूषेतील गाडगेबाबा 'आपल्या घरातीलच कुणी आहेत' या प्रमाणे प्रतिक्रिया दिल्यात.

या नाटकांत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका हुबेहुब अशोक जांभूळकर यांनी साकारली. गाडगेबाबांसोबतचे त्यांचे प्रसंग मन हेलावून सोडणारे होते. प्रबोधन, विचार आणि संस्कृती यांचा समेळ या प्रसंगात प्रामुख्याने जाणवला होता. कर्मवीर भाऊराव पाटलाची भूमिका अशोक वाचणेकर यांनी तर बनाजी तिडके(सावकार) अनिल कळमकर यांनी दमदार ऊभा केला. पाटील-मामा-सहकारी-मधुकर आंबेकर, तर-पाटलीन-गावकरी-प्राची कोटेवार यांनी केले. सखुबाई(गाडगेबाबांची आई) ही भूमिका सिने/नाट्य तारका मिनाक्षी बोरकर यांनी जीव ओतून केली. तशी प्रेक्षकांकडून त्यांना पावतीही मिळाली. सोबत कुंता-लिना पाटील, अलोकी-कृती दोडके, डेबू(लहान)-वंश कापसे, डेबू(तरूण)-रोशन खोब्रागडे हे कलावंतही आपआपल्या भूमिकेत कुठेच कमी पडले नाहीत. सरोदी-मुनिमजी-दिवानजी-महानंद या चारही भूमिकेत अभिनयाची विविधता दाखवण्यात जेष्ठ कलावंत अशोक गवळी यांनी आपली पकड कायम ठेवली. शेठजी-टिपणीस-अंगरक्षक-अनवर शेख यांनी खास शैलीत भूमिका वठवल्यात. पोवाड्या, शाहिरीची मोठ बांधतांना शाहिर-हिटलर भिवगडे, ढोलकी-अलंकार टेंभूर्णे, डफ-श्रावण घोडे, तुनतुना-वैभव, ताळ-स्वराज यांनी शेवटपर्यंत नाटकाची गती आणि रहस्य टिकवून ठेवले. रसिकांनी पोवाडा डोक्यावर उचलला. अत्रे-हनुमंता-अश्विन नाईक यांनी तर त्यांना उत्तम साथ उज्वल धानके यांनी दिली. साधू-अखंडानंद-प्रभात थेटे यांनी तर ब्राम्हण-अंगरक्षक-कमलेश रंगारी यांनी साकारला. गरीब माणूस-सहकारी-परमानंद लोणारे, इतर गावकरी, भक्तगण-ऊषा वाचनेकर, ईशांत धेटे, रितीक शामकुंवर, वंश कापसे, आदित्य कापसे (दारूड्या), विदिशा दोडके, तमन्ना भोयर, तन्मय भोयर, वंशिका चोपकर, शिप्रा विंचूरकर, दिशा गायकवाड, देवेंद्र वानखेडे, विशेष सहयोग अशोक माटे, भगवान पाटील, रवी चव्हाण, संजय पिसे, सुरण दोडके, मनोज मेश्राम यांचे सहकार्य लाभले. रंगभूषा- लालाजी श्रीवास, सोनू भैया, वेशभूषा-सुनिता दोडके, नेपथ्य-काळबांडे, प्रकाश योजना-किशोर बत्तासे, संगीत-भूपेश सवाई, संगीत संयोजन-विकास बोरकर(ऑडिओ सिटी, नागपूर) यांचे होते.

## स्टुडिओ किरायाने देणे आहे



दैनिक बहुजन सौरभने एक उत्कृष्ट दर्जाचा स्टुडिओ तयार केलेला आहे. बेरोजगार विद्यार्थ्यांसाठी एक आठवड्याचा मोफत कोर्स करण्याचा मानस आहे. ज्या कोणाला नाटक, गाणी, कराओके किंवा फेसबुक रिलवर टाकणारी कोणतीही माहितीसाठी स्टुडिओचा वापर करायचा असल्यास तासाप्रमाणे भाड्याने देणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क साधावा.



मो. 8482839451

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648